# रे.मु.नं.२४/१५ मधील नि.क.६८ वर आदेश

*पुंडलिक कांबरी व इतर ... वादी*
*वि.*
*दामू कांबरी व इतर ... प्रतिवादी*

१) सदरचा अर्ज वादीने, दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२) अर्जात वादीचे कथन की, दावा हा ठरावाकरीता, वाटपाकरीता तसेच मनाई हुकूमाकरीता दिला आहे. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २३ यांचे नाव नजरचुकीने प्रशांत शंकर उतेकर असे लिहीण्यात आले आहे. त्याठिकाणी प्रशांत शंकर ओळंबे असे घालण्यात यावे. सदर दुरुस्तीमुळे मूळ दाव्यात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे दुरुस्तीस परवानगी मिळावी. वादीने अर्जाचे पुष्टयर्थ्य नि.६९ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

३) सदर अर्जावर प्रतिवादींनी हरकत नसल्याचे कथन केले आहे.

२) अर्ज, प्रतिज्ञापत्र तसेच दाव्याचे अवलोकन केले. वादीने दाखल केलेल्या खरेदीखतामध्ये प्रशांत शंकर ओळंबे असे नाव नमूद असताना वादीने प्रशांत शंकर उतेकर असे नाव दाव्यात नमूद केले आहे. दावा वाटपाकरीता असल्याने सदर प्रकारची दुरुस्ती होणे गरजेचे आहे. सदरची दुरुस्ती ही टंकलेखनाचे चुकीमुळे झाल्याने न्यायाचे दृष्टीने ती मंजूर करणेस हरकत नाही. पण वादीने या बाबतची तजवीज योग्य पध्दतीने करणे गरजेचे होते पण तसे न झाल्याने वादी खर्चास पात्र रहातील. कारणे आदेश –

## आदेश

१) अर्ज रक्कम रु.१००/– चे खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२) वादींनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर दाव्यामध्ये दुरुस्ती करावी.

कर्जत
दि.१८/११/२०१६

(शु.भि.यादव)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.